# एक माणूस एक दिवस

## उत्तरार्ध

ह. मो. मराठे

रिया पब्लिकेशन्स्

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर - ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**एक माणूस एक दिवस : उत्तरार्ध**
ह. मो. मराठे

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर - ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**लेखक**
ह. मो. मराठे
६०७, 'ओ' इमारत, पिनाक मेमरीज,
कोकण एक्स्प्रेसच्या गल्लीत, कोथरुड, पुणे- ३८
फोन नं. ०२०-२५४३७५३० मो.नं. : ९४२३०१३८९२

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ ३६०/-

## *लेखकाचे प्रास्तविक*

'एक माणूस, एक दिवस' या नावाची एक लेखमाला मी काही वर्षांपूर्वी लिहीत होतो. एखादी प्रसिद्ध व्यक्ती आणि तिच्या भोवतीचा माहोल याचे शब्दचित्र रेखाटणं असं त्या मालिकेतील लेखांचं स्वरूप होतं. त्या लेखांची तीन पुस्तकं पूर्वी प्रसिद्ध झाली होती. त्यातील निवडक लेखांची दोन पुस्तकं 'एक माणूस एक दिवस : पूवार्ध' आणि 'एक माणूस एक दिवस : उत्तरार्ध' 'रिया' पब्लिकेशन्सचे श्री. शितल मेहता प्रसिद्ध करीत आहेत, याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

माझे पत्रकार मित्र 'दैनिक सकाळ' (पुणे) चे संपादक मल्हार अरणकल्ले यांनी नव्या पुस्तकासाठी एक रसग्रहणात्मक प्रस्तावना लिहून दिली. ती या पुस्तकांना जोडली आहे. मी श्री. अरणकल्ले यांचाही आभारी आहे.

– ह. मो. मराठे

पुणे–३८
जुलै २०१६

✦✦✦

## *जसं दिसलं तसं...*

अवघ्या अकरा-सव्वाअकरा महिन्यांच्या संपादकीय कार्यकाळात हमोंनी (ह. मो. मराठे) 'लोकप्रभा' साप्ताहिक एका उंचीवर नेऊन ठेवलं होतं. दर आठवड्याचा अंक विक्रमी वेगात खपू लागला होता. हमो पुढचा अंक कोणता विषयावर देणार, याबाबत वाचकांची उत्कंठा वाढत चाललेली होती... आणि अचानक हमो 'लोकप्रभा'तून बाहेर पडले. चारएक दशकं पत्रकारितेत नवनवे प्रयोग करणारा, स्वत:च्या लेखनशैलीचा मोठा वाचकवर्ग जोडणारा संपादक यशाच्या, आनंदाच्या, कौतुकाच्या शिखरावरून एका भयंकर अंधाऱ्या गर्तेत फेकला गेला.

मिलिंद रत्नपारखी आणि मिहिर थत्ते यांच्या कल्पनेतल्या 'घरदार' मासिकासाठी, हो-ना करता करता हमो संपादक म्हणून रुजू लागले. हमोंची प्रयोगशीलता मग 'घरदार'च्या निमित्तानं आकार घेऊ लागली. वर्गणीदार होण्यासाठीच्या अभिनव योजनेपासून या मासिकाचं नाव वाचकांच्या चर्चेत आलं; आणि हमोंच्या संपादकत्वाची घोषणा झाल्यावर त्याच्या यशस्वितेची गणितंही मांडली जाऊ लागली. 'घरदार' हे कौटुंबिक मासिकच होते; पण मराठीतल्या इतर कौटुंबिक मासिकांसारखं, बाळबोध मजकुरानं आणि कुटुंब, संस्कृती इत्यादींबद्दलच्या सनातन विचारांनी ते भरून काढायचं नाही, हे हमोंनी पक्कं केलेलं होतं. केवळ वैचारिक स्वरूपाचे निबंधही त्यांना नको होते. स्वत:चं वैशिष्ट्य असणारं, स्वत:चं व्यक्तिमत्त्व आणि चेहरा असणारं; तरीही लोकप्रिय स्वरूपाचं मासिक हवं, असा त्यांचा आग्रह होता, हमोंनी अंकाची आखणी या विचारांतून सुरू केली. पहिला अंक प्रसिद्ध झाला. (जानेवारी १९८८)

हमोंमधील संपादकाला त्यात आणखी काही वेगळं, वाचकांना खिळवून ठेवणारं हवं होतं. नामवंत व्यक्तीविषयी जाणून घेणं वाचकांना नेहमीच आवडतं, एवढं सूत्र धरून विचार सुरू होता; आणि त्यातूनच 'पर्सनॅलिटी रिपोर्ट'ची नवी मांडणी हमोंना सुचली : 'एक माणूस, एक दिवस' शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या व्यक्तिमत्त्वाचे, मिश्किल आणि आग्रही स्वभावाचे वेगवेगळे पैलू

उलगडून दाखविणारा पहिला लेख 'एक माणूस, एक दिवस' या सदरात प्रसिद्ध झाला; आणि वाचकांनी त्याला प्रचंड प्रतिसाद दिला. एवढी ताजी, प्रसन्न, टवटवीत, विलक्षण लक्षवेधी शैली आणि लेखनाचा फॉर्म अगदी नवा होता. नामवंत व्यक्तीबरोबर एखादा दिवस घालवून, त्याच्या दिनक्रमाच्या तपशीलातून तिचं व्यक्तिमत्त्व शोधण्याचा यातील प्रयत्न वाचकांना खिळवून ठेवणारा होता. ही व्यक्ती निर्णय कसा घेते, काम कसे करते, कुणाला भेटते, काय बोलते, तिची मन:स्थिती कसकशी बदलत राहते, तिच्या सवयी-लकबी काय, छंद काय, लपून राहिलेला एखादा कोपरा कुठला असं सारं या फॉर्ममधून उलगडलं जाऊ लागलं. पारंपरिक परिचय-लेख, मुलाखती यांपेक्षा हे पूर्ण वेगळं ठरलं.

'घरदार'मधून असे दहा-अकरा लेख प्रसिद्ध झाले. पाच-सहा वर्षांच्या खंडानंतर 'किर्लोस्कर'मधून आणखी आठ-दहा व्यक्तींसंबंधी या नावाच्या सदरातूनच लिहिलं गेलं. तीन वर्षांनंतर आणखी पाच लेख तयार झाले, ते एका स्वतंत्र पुस्तकासाठी 'एक माणूस, एक दिवस' याच नावानं तीन भागांचं एकत्रीकरण करून, त्यातील काही निवडक व्यक्तींसंबंधीचं लेखन या नव्या पुस्तकात एकत्रित केलेले आहे. राजकारण, समाजकारण, संशोधन, उद्योग, अभिनय, आध्यात्मिक, कला, साहित्य अशा विविध क्षेत्रांत गाजणाऱ्या व्यक्तिमत्त्वांचा समावेश हमोंनी या मालिकेत केला.

य सगळ्या व्यक्ती नेहमी अतिशय व्यग्र असणाऱ्या. लोकांच्या गराड्यात वावरणाऱ्या. प्रवास, बैठका, विविध प्रश्नांवर उपाय शोधण्यात बुडून जाणाऱ्या. त्यामुळे भेटीसाठी वेळ मिळणे हेच मुळात खूप कठीण. शिवाय, सुरुवातीला त्यांच्यापैकी अनेकांना या लेखनामागील कल्पना स्पष्ट होत नसे. दिवसभर माझ्याबरोबर थांबून तुम्ही काय पाहणार, या वेगळ्या विषयांत किती वाचकांना रुची असणार, मी कुणालाही मुलाखत देत नाही अशा स्वरूपाचीच बहुतेकांची उत्तरं. काहींना ही कल्पना अभिनव वाटते, ते मात्र चटकन होकार देतात. पत्रकारितेमुळे यापैकी काहींना हमो पूर्वी कुठल्या ना कुठल्या निमित्तानं भेटलेले; किंवा लेखक म्हणून तर त्यांचं नाव बहुतेकांपर्यंत पोहोचलेलं. तिथं रस्ता काहीसा सुलभ होई; पण तरीही 'तुम्हाला अपेक्षित असलेलं काही हाती लागणार नाही हो' अशी अनेकांची भावना असे. या व्यक्तींबरोबर एक दिवसभर राहण्याची वेळ अशा अनेक अडथळ्यांतून ठरे. हा दिवस त्यांच्या भरपूर कामांचा,

बैठकांचा, प्रवासाचा किंवा अगदी दैनंदिन कार्यालयीन कामकाजाचा असा कुठलाही असो, हमोंना तो मंजूर असे.

पत्राद्वारे किंवा फोनवरून हमोंना परवानगी मिळे. हमो तिथं दाखल होत. भेटीचं ठिकाण कधी त्या व्यक्तीचं निवासस्थान असे, कधी कार्यालय असे किंवा कधी प्रवासात, सभा-बैठकांच्या ठिकाणीही हमो त्यांच्याबरोबर असत. तिथं दाखल झाल्यापासून हमो सारं अत्यंत बारकाईनं टिपत. तिथलं वातावरण, माणसांची गर्दी, भेटीसाठी येणारी माणसं, राजकीय नेत्यांच्या प्रचार-सभांच्या वेळची घाई, फोनवरील संभाषणं, बैठकांमधील चर्चांचे विषय, त्यांना मिळत जाणारी वळणं असं काहीही हमोंच्या नजरेतून सुटत नसे. संबंधित व्यक्तीचं राहणीमान, स्वभाववैशिष्ट्यं, छंद, आवडी-निवडी हेही त्यांच्या कृतीतून, संभाषणातून त्यांच्याकडे जमा होई. मध्ये मध्ये हमोंचा या व्यक्तींशी संवादही होई. हजरजबाबीपणा, मिश्किल वृत्ती, साधेपणा, आग्रह, ठामपणा असे विविध पैलू त्यातून लक्षात येत. अशा विलक्षण निरीक्षणशक्तीचा हमोंनी सर्व लेखनात चपखल वापर केला. एखादं व्यक्तिमत्त्व जाणून-समजून घेण्याचा हा प्रयत्न म्हणूनच खूप लक्षवेधी ठरला.

परिचय लेखात सर्वसाधारण माहिती जाते; आणि तीही बहुतेक वेळा संकलित केलेली असते. लेखकाचा संबंधित व्यक्तीशी थोडाफार परिचय असेल, कधी काही विषयांवर चर्चा करण्याची संधी मिळाली असेल, तर त्या लेखनात काही अंशी जिवंतपणा येतो. मुलाखतींतून उलगडणारं व्यक्तिमत्त्व अनेकदा एकांगी, केवळ प्रश्नांभोवती फिरणारं आणि या अनुषंगानं त्यांचे विचार स्पष्ट करणारं असतं. एखादं व्यक्तिमत्त्व जाणून घेण्यासाठी तोपर्यंत हेच दोन प्रकार लेखनात हाताळले गेले. व्यक्तीबरोबर एक दिवस घालवून तो टिपणं; आणि त्यातून तिच्या व्यक्तिमत्त्वाचा वेध घेणं, त्यासाठी सहज-सोपी, संवादी लेखनशैली वापरणं हे हमोंनी प्रथमच केलं. विशेषत: पत्रकारितेत 'रिपोर्ताज्' हा लेखनप्रकार हाताळला जाई; पण तोही असा अलीकडचाच. एखाद्या घटनेचा मागोवा, एखाद्या सामाजिक अन्यायाचा छडा, अनिष्ट प्रथांमुळे होणारी काही समाजघटकांची पिळवणूक किंवा एखाद्या ठिकाणाचं चित्रदर्शी वर्णन इथपर्यंतच तो पोहोचत असे; पण पारंपरिक पत्रकारितेच्या तुलनेत निराळा असल्यानं हा नवा फॉर्मही वाचकांना रुचला. मोठा वाचकवर्ग त्याच्याशी जोडला गेला. हमोंनी शोधलेला रस्ता त्यापेक्षा वेगळा; आणि माणसांशी जोडलेला असल्यानं अधिक रसरशीत-जिवंत ठरला.

यातील बव्हंशी लेखन प्रामुख्यानं मासिकांसाठी केलेलं आहे. एका महिन्यानं भेटणारा वाचक खिळवून ठेवण्याच्या काही ना काही क्लृप्त्या राबविल्याशिवाय वाचक पुन: पुन्हा इकडं वळत नाही. हमोंनी या दोन्ही प्रकारच्या प्रकाशनांसाठी दीर्घकाळ संपादनाची जबाबदारी सांभाळलेली आहे. संपादकाला नेहमीच वाचकांच्या नजरेतून विचार करावा लागतो. हमो तर अतिशय कल्पक आणि प्रयोगशील संपादक. अंकासाठी नवं-वेगळं काय, वाचकांना काय हवं असेल, कुठल्या मजकुराशी वाचकांचं नातं घट्ट होईल, याचा शोध हमोंनी सातत्यानं घेतला, हे त्यांची संपादकीय कारकीर्द पाहता स्पष्टपणानं दिसतं. 'एक माणूस, एक दिवस' या स्वरूपाच्या लेखनात तर त्यांची प्रयोगशीलता आणि वाचकांची नाडी ओळखण्याचं कसब ठळकपणानं आढळतं. 'नामवंतांविषयी वाचकांना माहिती हवी असते' या सूत्रानुसार हे लेखन त्यांनी केलं असलं, तरी त्याला जे वेगवेगळे आयाम जोडले गेले, त्यामुळं या लेखनाला नवेपणा आला आहे.

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या भेटीपासून या लेखांचा श्रीगणेशा झाला. 'वृत्तपत्रीय लेखनांच्या संकेतात न बसणारं आणि विश्वासघाताच्या स्वरूपाचं काहीही लिहिणार नाही. शक्यतो टेपरेकॉर्डरही आणणार नाही,' अशी कबुली देऊन एके दिवशी हमो 'मातोश्री'वर पोहोचतात. मोठ्या ताकदीचे राजकीय व्यंगचित्रकार, प्रभावी वक्ते, वजनदार राजकीय नेते, स्पष्टवक्ते ही बाळासाहेबांची सर्वसामान्यांना ठाऊक असलेली प्रतिमा; पण त्यांच्याबरोबर हमोंनी घालविलेल्या एका दिवसातही बाळासाहेबांची कितीतरी वेगवेगळी रूपं खुलत-उलगडत जातात. मध्ये मध्ये होणाऱ्या संवादातून कितीतरी माहिती मिळत राहते. फी भरायला पैसे नव्हते, म्हणून बाळासाहेबांना मॅट्रिकच्या परीक्षेला बसता आलं नव्हतं. बाळासाहेबांनी संगीतकार व्हावे, अशी त्यांच्या वडिलांची-प्रबोधनकारांची इच्छा होती. त्यासाठी त्यांना बुलबुलतरंगही आणून दिला होता, पण संगीतकार झाले श्रीकांत ठाकरे. बाळासाहेब राजकीय व्यंगचित्रकार झाले. तो वारसा त्यांच्या पुतण्याकडं-स्वरराजकडं-गेला. स्वरराज म्हणजेच राज ठाकरे. बाळासाहेब सांगतात : चांगली आहे त्याची लाईन. (ही त्यांची शिफारस असते.) 'मी वाऱ्याला माझी दिशा द्यायचा प्रयत्न करतो' यासारख्या विधानातून बाळासाहेबांचं कणखर व्यक्तिमत्त्व आणि त्यांचा प्रखर आत्मविश्वास दिसतो. बाळासाहेबांच्या सभा म्हणजे लोकांची गर्दी हे समीकरण कसं जुळलं असेल?

– वाचकांच्या मनातील या प्रश्नाचं उत्तर किती सहजपणानं मिळतं पाहा. बाळासाहेब म्हणतात : मी भाषण करीत नाही. बोलतो. साधं-सोपं. मी श्रोत्यांशी संवाद करतो. इंदिराजींनी देऊ केलेलं राज्यपालपद बाळासाहेबांनी नाकारलं होतं. कारण? उत्तरात तेच स्पष्ट करतात : ती माझी राजकीय आत्महत्याच ठरली असती. हार्मोनियमवादनाच्या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित राहणारे बाळासाहेब, सफाईदार इंग्रजी बोलणारे बाळासाहेब, क्रिकेट सामन्यासाठी दिवस राखीव ठेवणारे बाळासाहेब, नातवाशी खेळणारे बाळासाहेब, कार्यकर्त्यांचं ऐकून घेणारे आणि त्यांना सूचना देणारे बाळासाहेब... 'ब्रश आणि बंदूक' या शीर्षकाच्या लेखातून उलगडतात ते असे 'व्यामिश्र' बाळासाहेब.

'नाट्यधर्मी' श्रीराम लागू विंगेत उभे आहेत. पहिली घंटा झाली आहे. लागूंनी डोळे मिटून घेतले आहेत. ते भूमिकेत शिरू लागले आहेत. हातांच्या तळव्यांच्या अस्वस्थ हालचाली होऊ लागल्या आहेत. त्यांच्या सगळ्या व्यक्तिमत्त्वातून ती भूमिका निनादत असल्यासारखं जाणवतं आहे. दुसरी घंटा : लागू खुर्चीतून उठून विंगेजवळ पोहोचले आहेत. धोतर-शर्ट नीट करून हात मागं टाकले आहेत. त्यांनी तळव्यात तळवा गुंतविलेला आहे. ते भूमिकेला भिडत होते. भूमिका त्यांच्यात भिनत होती. तिसरी घंटा : दिवे गेले. अंधार झाला. थिएटरमध्ये पिनड्रॉप सायलेन्स. रंगमंचावर एका भागात स्पॉटलाईट पडला आहे; आणि लागूंचे सानुनासिक शब्द ऐकू येऊ लागले आहेत... नंतरचा दीड तास लागू रंगमंचावरच. लागूंमध्ये कणाकणात भरलेला नाट्याचा धर्म यापेक्षा आणखी कुठल्या शब्दांत सांगता येणार?

मुंबई मुख्यमंत्र्यांचं सरकार निवासस्थान वर्षा. रविवारमुळं नेहमीपेक्षा गर्दी कमी आहे. शरद पवार दोन दिवसांच्या दौऱ्याहून परतले आहेत. त्या दिवशीच्या मोजक्या अपॉइंटमेंटमध्ये हमोंचं नाव आहे. खास दालनात ते पवारांची प्रतीक्षा करीत बसलेले आहेत. पवारांची भेट. ते प्रसन्न. चेहऱ्यावर जराही थकवा नाही. त्यांच्याबरोबर राहण्याचा दिवस ठरवायचा असतो. पुढील कार्यक्रम पवारांना तोंडपाठ असतात. ते हमोंना वेळ, स्थळ सांगतात. नाईक चोपदार सूचना करतात: साहेब वेळेच्या बाबतीत कडक आहेत. वेळ मोडलेली त्यांना चालत नाही. निरीक्षकांच्या अशा छोट्या-छोट्या नोंदीतून पवारांचं व्यक्तिमत्त्व उलगडत जातं. कार्यकर्त्यांशी ते जेवढ्या सहजपणानं बोलतात, त्याच पद्धतीनं त्यांचं पंतप्रधानांशीही संभाषण होतं. हमो पवारांबरोबर दौऱ्यात सहभागी होणार असतात.

हेलिकॉप्टरमध्ये त्यांची जागा राखून ठेवण्याची सूचना केली जाते. प्रचार-सभांतील, शाळेच्या उद्‌घाटन कार्यक्रमातील पवार हमोंच्या टिपणांतून पुढं येत राहतात.

मनोहर जोशींबरोबरचा दिवसही 'वर्षा' पासूनच सुरू झाला आहे. बाहेर पडेपर्यंत भेटू इच्छिणाऱ्यांचीच गर्दी. बाहेर निघण्याची वेळ पंत हमखास पाळतात. मंत्रालयाच्या दिशेनं प्रवास सुरू होतो. मुख्यमंत्र्यांची गाडीही ट्रॅफिक जाममध्ये अडकते. सिग्नलला थांबते. मंत्रालयातील लिफ्टही आपल्यासाठी अडकवून न ठेवण्याची सूचना पंतांनी केलेली असते. पंतांचा एकूण सारा कारभार हा असाच. 'सहृदय, सभ्य गृहस्थ' असल्याची खूण पटविणारा.

परिवहनमंत्री प्रमोद नवलकर यांच्याबरोबर खासगी गाडीतून हमो एस. टी. स्थानकावर आलेले आहेत. रिझर्व्हेशन खिडकीसमोर रांग आहे. माणसं तासभर उभी आहेत. हिशेबासाठी अर्धा तास खिडकी बंद आहे. गाड्या कशा उभ्या केल्या जाताहेत, स्वच्छ केल्या जाताहेत का, लोकांना बसण्यासाठी पुरेसे बाक आहेत का, अशी अनेक प्रकारची माहिती नवलकर स्वत: फिरून घेत राहतात. मग कँटिनमध्ये चहाची ऑर्डर देतात. बिल देऊन बाहेर पडतात. एक पांढरी गाडी तिथं उभी असते. मंत्री एस. टी. स्थानकावर आल्याची खबर मिळताच, एस. टी. चे अधिकारी मंत्र्यांच्या स्वागतासाठी हजर झालेले असतात. मुंबईत भटकंती करणारे नवलकर, या अनुभवातून चाळीसएक... पुस्तकं लिहिणारे नवलकर, खात्याच्या बैठकांत, सर्वसामान्यांच्या अडचणी दूर करण्यात गढून गेलेले नवलकर... अशी कितीतरी रूपं उलगडत राहतात. त्यांनी जीवनाचं तत्त्वज्ञान सांगितलं आहे: रोज एकाला तरी हसवावं. प्रत्येकानं रोज एका माणसाला हसवलं, तर जग किती सुखी होईल! नवलकरांचं आणखी एक म्हणणं आहे : माणसं अंगठ्यांत खडे घालतात. मीही दोन खडे महत्त्वाचे मानतो. एक बर्फाचा आणि दुसरा साखरेचा. एक डोक्यावर ठेवायचा आणि दुसरा जिभेवर.

भ्रष्टाचारविरोधी जनआंदोलनाच्या केंद्रस्थानी असलेले अण्णा हजारे यांनी मनोहर जोशी यांच्या सरकारमधील दोघा मंत्र्यांना घरी पाठविलेलं असतं. ग्रामसुधारणा, आदर्श खेडी अशा आंदोलनांतून आकाराला आलेल्या चळवळीबाबत सर्वत्र-विशेषत: तरुणांत कमालीची उत्सुकता होती. अण्णांभोवतीच्या गर्दीत सगळेच बेमालूम मिसळत होते. मूळ रूपांचं शुद्धीकरण करण्याचा काहींचा प्रयत्न असे. अण्णांच्या बरोबर व्यासपीठावर असणाऱ्यांतही ही मंडळी अग्रभागी असत.